# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०५/०२/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०५/०२/२००४ रोजी सभा सुचना क्र. ३२ दि. ३१/०१/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ७) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ९) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| १०) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| ११) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १२) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ४) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

**(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)**

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, सभा सुरू होण्यापुर्वी आपल्या परवानगीने महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो की, आपल्याकडे कर विभागात जे घरपट्टी वसुली करतात. त्या संदर्भातील हा महत्त्वाचा विषय आह. गेल्या ३/२/०४ रोजी भाईंदर (पुर्व) येथे गणपती कृपा बिल्डिंग जी- ४, ५ हे जे खातेदार आहेत त्यांचे एकूण ४,५११/- रुपये भरायचे होते आणि त्यांनी ते १५/१२/०३ रोजी पैसे भरले आणि त्यांच्या बँक अकाउंटमध्ये तो चेक क्लिअर झाला आणि संपुर्ण पैसे खातेदाराने भरल्यानंतर नगरपालिकेचे अधिकारी श्री. वाघ आणि त्यांचे संबंधित कर्मचारी जे आहेत त्यांनी तिथे जाउन दादागिरी केली आणि पैसे भरले असताना देखील तिथे सील केले. तेव्हा मला त्या लोकांकडून फोन आला की, आम्ही रक्कम भरूनही आमचा गाळा सील केला तर श्री. वाघ ह्यांनी त्यांच्याकडून दुरध्वनी घेतला आणि मला सांगितले की, त्यांचे ३५,०००/- रूपये बाकी आहेत म्हणून आम्ही हा गाळा सील करत आहे असे त्यांनी सांगितले. तेव्हा मी त्यांना सांगितले की, ठिक आहे जर त्यांची रक्कम भरायची बाकी आहे तर आपण त्यांना मुदत द्या व त्यानंतर मी नाईक साहेबांना सांगितले की, त्यांनी रक्कम भरलेली आहे तरी देखील त्यांचा गाळयाला सील लावण्यात आली. तसेच, त्याबाबतचे पत्रही मा. आयुक्त महापालिका यांच्या

नावाने तक्रार पत्र देण्यात आलेले आहे. (त्या पत्राचे सभागृहासमोर वाचन करून दाखविले.) सभापती साहेब, माझा सांगण्याचा तात्पर्य एवढाच आहे की, १५/१२/२००३ रोजी पैसे भरले होते आणि असे असताना देखील सील केले आणि दोन महिन्यापुर्वी पैशांची मागणी केली त्यामुळे ह्या संपुर्ण प्रकरणांची चौकशी व्हायला पाहिजे. आपण यामध्ये एक सदस्य किंवा दोन सदस्य घेउन चौकशी कमिटी करायला पाहिजे. नेमके ईदच्या दिवशी त्यांना केवढा मनस्ताप झाला.

**मा. सभापती :-**

आपल्या अधिका-यावर आपण कार्यवाही करू.

**आसिफ शेख :-**

गंभीर तक्रार आहे. त्या दुकानंदाराने करभरणा केलेला असताना देखील त्या अधिका-याने व कर्मचा-याने गाळयास जाणूनबुजून सील ठोकले याची चौकशी करा. व त्यांनी आमच्याकडे पैसे मागितले आणि आम्ही त्यांना दिले नाही.

**मा. सभापती :-**

आपण आजच्या आज त्याच्यावर निकाल लावू या.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, रूल्स और रेग्यूलेशन बनानेका है तो आप सबके लिए बराबर बनाना ।

**मा. सभापती :-**

आजके बाद मैं आपके साथ हूँ ।

**मोहन पाटील :-**

येथे सर्वांना चांगल्या गोष्टी पाहिजे व त्याच बरोबर चांगले प्रशासनही पाहिजे. आपण आपला चांगला प्रस्ताव मांडलेला आहे पण रिटा शाह मॅडम बोलले तेही योग्य आहे. पण ह्या विषयी जे बोलले त्यामुळे हा विषय कसा आहे ते आपण बघा. आपण चांगले काम करतो आणि प्रशासन चुकते तरी ते ब्लेम आपल्यावर लागतात ते लागू नये म्हणून.

**रिटा शाह :-**

गेल्या वेळी मी पण मुद्दा उठविला होता की, व्यापाराने आणलेला माल सोडत नाही आणि तो जकात ठेकेदार हा गुंडागर्दी करतो हा मुद्दा उठविला होता आणि तो देखील चिंतेचा विषय आहे.

**मा. सभापती :-**

जर आपल्याला यापुढे आठ दिवसात न्याय मिळत नसेल तर आपण माझ्याकडे या. यामध्ये आपण योग्य तो निर्णय घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, भाईंदर पश्चिमेला तीन दिवसापुर्वी प्रचंड मारामारी झाली. ऑक्ट्रायवाल्यांचे चार ते पाच कर्मचारी होते आणि दिडशे ते दोनशे लोक होते. आपण त्या अग्रवालला बोलवा पण त्याला आपण आमच्या समक्ष बोलवा आणि मेहेरबानी करून आपण हा विषय लाईटली घेउ नका. म्हणजे त्याचा ठेका संपायला अजून दोन महिने आहे आणि ह्या दोन महिन्यामध्ये बरेच काही होउ शकते. आपल्या नगरपालिकेचा एक अधिकारी होता संतोष नगरला आणि जवळजवह साडेतीन लाखाची तिथे तोड झाली.

**मा. सभापती :-**

आपण या विषयावर सभा संपल्यानंतर बोला.

**धनराज अग्रवाल :-**

उसके लिए अगर आप खास सभा नही लेंगे की, उसका कुछ भी नियम लागू नही होता है क्या? उपआयुक्त साहब, उन्हकी सुनते है, हमारी बात नही सुनते है। कानुन बनानेके बाद भी कानुन का पालन नही होता है।

**मा. सभापती :-**

याबाबत आपण मा. आयुक्त साहेबाची भेट घेउ या.

**मिलन म्हात्रे :-**

ॲग्रीमेंटची कॉपी आम्हाला सर्वांना मिळालेली नव्हती त्याच्यात काय लिहिले आहे त्याचे आपण स्टडी करा. त्याच्यामध्ये असे काही मॅटर आहे त्याची सभागृहात कधीही चर्चा झालेली नाही. ते मला वकीलांकडून अग्रीमेंट मिळालेले आहे. त्याच्यात जी टर्म आणि कंडीशन आहे त्याच्यात त्यांनी ते फ्रॉड केलेले आहे. जकात ठेकेदार हा सीमा ओलांडून गेला की, त्याचे तो दंड घेतो पण ते बरोबर नाही.

त्यांनी ते दंड घेउ नये म्हणून मी पत्र दिले आहे. व प्रशासनाकडूनही येथे दंड भरण्यात येउ नये असे बोर्ड लावण्यात आलेले नाही ते बोर्ड लावण्यात यावा.

**मा. सभापती :-**

आजच्या आज ते बोर्ड लावण्यात यावे.

**धनराज अग्रवाल :-**

दंड घेण्याचा अधिकार त्याला नाही आहे तरी तो दंड घेत आहे.

**दिनेश नलावडे :-**

केळकर साहेब, आपली समोरासमोर बैठक झाली आहे. आपल्या तिथे असे निर्दशनास आले की, ते गाडीवाल्यांना पुढे जायला देतात आणि गाडी पुढे गेल्यानंतर ते ती गाडी अडवतात आणि सांगतात तुम्ही जागेवर गाडी थांबविली नाही म्हणून आता तुम्ही दंड भरा. अशाप्रकारे त्यांच्यावर शंभर टक्के दंड आकारला जातो आणि ह्याच्यामध्ये महानगरपालिका आणि लोकप्रतिनिधी बदनाम होत आहे.

**आसिफ शेख :-**

मागच्या नगरपालिकेच्या वेळी जेव्हा जकात चालू केले होते त्यावेळी आम्ही अशी सुचना केली होती की, ह्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी एक समिती बनविण्यात यावी. जकात तक्रार निवारण समिती जेणेकरून तक्रारीचे निवारण होत जाईल. १९४९ चे कलम ३० अन्वये आपण अशी समिती बनवू शकतो. जेणेकरून नागरिकांच्या ज्या तक्रारी आहेत त्याचे निवारण करण्यात येईल.

**रिटा शाह :-**

समिती बनवायची आहे ते आपण नंतर बनवा आणि मी आपल्याला जकात कराबद्दल तक्रार केली होती त्याची चौकशी करूनच मी तो विषय उचलला होता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

सन्मा. सभापती आणि सभागृह सदस्य जकात विषयक अनेक तक्रारी येत असतात आणि त्याची वेळोवेळी आम्ही दखल घेतलेली आहे. आपल्या शहरात मोठया प्रमाणात बहुसंख्य व्यापारी, कारखानदार अंडर एस्टीमेट दराने महानगरपालिका हद्दीत माल आणतात. समजा ह्या पेनाची किंमत पंधरा रूपये आहे तर ते दोन रूपये याप्रमाणे त्याची किंमत लिहिलेली असते असे मोठया प्रमाणात सुरूवातील निर्दशनासे आलेले आहे आणि आपल्याला जकात या माध्यमातूनच नगरपालिकेला मोठया प्रमाणात उत्पन्न हे प्राप्त होते आणि याकरिता आपण जकात अभिकर्त्याची नियुक्ती केलेली आहे. तसेच, आमच्याकडे तक्रार आल्यावर आम्ही ती गाडी लगेचच सोडून दिली आहे.

**रिटा शाह :-**

साहेब, तो जकात अभिकर्ता आपण लिहून दिलेले देखील ऐकत नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

आम्हाला जेव्हा तक्रार आली तेव्हा आम्ही सर्व तक्रारी आयुक्त साहेबांच्या निर्दशनास आणून दिली आहे आणि त्याच्यावर चौकशी करतो.

**रिटा शाह :-**

चौकशी करा तुम्ही.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण म्हणालात ती गाडी आम्ही लगेचच सोडली. आपण चुकीचे उत्तर देत आहात. आपण त्या जकात अभिकर्त्याचे एवढे ऐकता आपण दलाली करता.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो. ) :-**

मिलनजी म्हात्रे आपण जे शब्द सभागृहात वापरले आहे की, आम्ही दलाली करतो ते शब्द आपण आपले परत घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

मी ह्यात खोटे कुठे बोलतोय.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

आपण जे बोलले तो शब्द जर आपण मागे घेत नसाल तर मी ह्या सभागृहात पुन्हा उपस्थित राहणार नाही. मी सभा त्याग करेन.

**(११.४५ वाजता मा. केळकर साो. यांनी सभा त्याग केला.)**

**मोहन पाटील :-**

सभापती साहेब, आपण अधिकाऱ्यांना बरोबर घेउन काम करत असतो. हे जे असे शब्द वापरले आहे ते शब्द आपल्याला सभेच्या कामकाजातून काढता येतात. मी मिलन म्हात्रे साहेबांना विनंती करतो की, त्यांच्या ह्या बाबत ज्या तीव्र भावना आहेत, जर ह्या शहरामध्ये व्यापारी टिकला व व्यापारी राहिला तर अशाप्रकारचे धोरण आपल्या येथेच नाही तर देशामध्ये आहे. सभापती साहेब, आपण सन्मा. सदस्यांना विनंती करावी की, हा शब्द कामकाजातून काढावा.

**(केळकर साहेबांनी सभा त्याग केल्यानंतर सर्व अधिकारी वर्गानेदेखील सभा त्याग केला.)**

**मिलन म्हात्रे :-**

मी माझे शब्द मागे घेणार नाही. त्यांनी सांगावे की, असे नाही आहे. याबाबत माझ्याकडे सर्व पुरावे आहेत.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण थोड्या वेळाकरिता सभा तहकुब करावी.

**मा. सभापती :-**

दहा मिनीटाकरिता ही सभा मी तहकुब करत आहे.

**सभा तहकूब वेळ :- सकाळी ११.५० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**